**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १००/२०१९ मधील निशाणी क्र. ३६ वरील आदेश</u>**

( कमळाबाई पथवे व इतर वि. ठकुबाई लोते व इतर)

वादी यांनी सदरचा अर्ज वादी क्रमांक २ यांचे विरुध्द दावा अवसायन पावल्याचा आदेश रदद् होणेकरीता दाखल केला आहे.

**०२.** अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०३.** वादी क्रमांक २ यांचा मुत्यु दिनांक २०.०९.२०२३ रोजी झाला आहे. कायदेशीर तरतुदींप्रमाणे सदर वादी क्र. २ चे कायदेशिर प्रतिनिधी दिनांक १९.१२.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, तसे न केल्यामुळे वादी क्र. २ करीताचा दावा अवसायन पावला आहे. कायदेशिर तरतुदींप्रमाणे दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होणेकरीता प्रस्तुत अर्ज दि. १९.०२.२०२४ किंवा त्यापुर्वी दाखल करणे आवश्यक होते. नि.२८ वरील आदेशाप्रमाणे दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होणेकरीता अर्ज दाखल करणेस झालेला विलंब माफ करण्यात आलेला आहे. प्रस्तुत दावा वादीने वाटपाकरीता दाखल केलेला आहे. वादी क्र. २ चे पश्चात त्याचे कायदेशिर प्रतिनिधींना प्रस्तुत दावा चालविण्याचे अधिकार प्राप्त होतो. सबब, वादी क्र. २ चा दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द करणे न्यायाचे दृष्टिने आवश्यक व गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्र. २ चा दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द करण्यात येतो.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—

स्थळः— इगतपुरी
दिनांकः— २०/०१/२०२६

( मो. द. ननवरे )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
इगतपुरी.